दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १९ जूले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# खोटा पत्ता, रेशन कार्डही खोटे ! पूजा खेडकरचा नवा प्रताप !

**वादळवार्ता/मुंबई**
प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरचे प्रकरण देशभरात गाजत असताना, तिने नवनवे कारणामे समोर येत आहेत. आता साम टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार पूजा खेडकरने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये शासकीय रुग्णालय असलेल्या वायसीएममध्ये तळवडे येथील बंद पडलेल्या कंपनीचा पत्ता आणि खोटे रेशन कार्ड सादर केल्याचे समोर आले आहे.



पूजा खेडकरच्या या सर्व प्रतापांमुळे तिच्यावरील कारवाईला सुरूवात झाली असून, आता हे नवे प्रकरण समोर आल्यामुळे तिच्या अडचणी वाढणार आहेत यात शंका नाही. साम टीव्हीने आपल्या वृत्तात म्हटले आहे की, "प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी खोटे रेशन कार्ड आणि तळवडेतील बंद पडलेल्या कंपनीचा पत्ता पिंपरी-चिंचवडमधील वायसीएम रुग्णालयात सादर केला होता. पूजा खेडकरने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दिलेल्या पत्त्याची पाहणी करताना तेथे प्रत्यक्षात एक बंद पडलेली कंपनी असल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान अनेक वादांमध्ये सापडलेल्या प्रशिक्षणार्थी IAS अधिकारी पूजा खेडकरचा महाराष्ट्र सरकारचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. उत्तराखंडमधील मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीने तिला तातडीने परत बोलावण्याचे पत्र जारी केले आहे. अकादमीने त्यांना पुढील आवश्यक कारवाईसाठी परत बोलावण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी लिहिलेल्या पत्रात, "अकादमीने खेडकर यांचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे आणि पुढील आवश्यक कारवाईसाठी त्यांना परत बोलावण्यात आले आहे," असे म्हटले आहे. राज्य सरकारच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, त्यांना २३ जुलैपर्यंत LBSNAA ला अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे. या वादानंतर पूजाच्या नियुक्तीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या संदर्भात, केंद्राने नुकतेच तिच्या नियुक्तीची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र केडरच्या आयएएस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन केली आहे. खेडकरची नियुक्ती आणि इतर तपशीलांची अतिरिक्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून छाननी केली जाणार आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खेडकर दोषी आढळल्यास तिला सेवेतून बडतर्फ केले जाऊ शकते.

## अखेर झुंज संपली पत्रकार सुधाकर सोनवणेंचे निधन



(बीड-विवेक कुचेकर)जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आपली लेखणी चालवणारा पत्रकार सुधाकर सोनवणे यांची प्रदिर्घ आजाराशी असलेली झुंज अखेर संपली असुन बुधवारी दि(१७)रात्री निधन झाले.जन्मगावी तागडगाव (ता.शिरूर का) येथे शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. बीडच्या पत्रकारितेत अल्पवधीतच आपल्या लेखणीचा वेगळा ठसा उमटविणारे , चळवळीतील संघर्षशील पत्रकार म्हणुन परिचित असलेले सुधाकर सोनवणे एक वर्षापासुन कॅन्सर सारख्या घातक आजाराशी सामना करीत होते. आजारपणात त्यांना अनेकांनी मदत केली,उपचार सुरू होते.पंरतु तब्येतीने साथ दिली नाही .बीडच्या पत्रकारांनी चला सुधाकरला वाचवू या ....मोहिम राबवुन ,मोठा आधार देण्याचा प्रयत्न केला होता.आपला सहकारी यावर मात करून परत आपल्यात येईल व पुन्हा उभारी घेईल असे वाटले होते.पंरतु नियतीने डाव साधला असुन बुधवारी रात्री सुधाकरचे निधन झाले.तर गुरूवारी (दि.१८)सकाळी १० च्या सुमारास जन्मगावी तागडगाव,ता.शिरूर कासार येथे अंत्यविधी करण्यात आला. यावेळी नातेवाईक ,मित्र परिवारासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## खरीप हंगाम वर्ष २०२४ पीक स्पर्धेसाठी आवाहन

बीड, दि. 18, : राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या पिक उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरात इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत विकास स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. राज्यात खरीप हंगाम सन 2024 मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफुल या 11 पिकांसाठी पिकस्पर्धा आयोजन करण्यात आली आहे. पिकस्पर्धेसाठी तालुका हा घटक आधारभूत धरण्यात येतो. शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीस देण्यात येतात.
बक्षीसाचे स्वरूप
1. राज्यस्तरीय प्रथम क्रमांक बक्षीस रक्कम रुपये 50000/-
2.राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये 40000/-
3.राज्यस्तरीय तृतीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये 30000/-
खरीप हंगाम सन 2024 स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. 300 व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रुपये 150, प्रवेश शुल्क भरून पीक स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल. स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख मूग व उडीत पिकासाठी 31 जुलै 2024 व भात, ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी 31 ऑगस्ट 2024 अशी अंतिम दिनांक आहे. अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे कळविण्यात आलेले आहे.

## महसूल कर्मचारी बेमुद्दत संपावर : धारूर तहसील कार्यालयामधले कामकाज ठप्प

**धारूर / प्रतिनिधी धारूर येथील** महसूल कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यासाठी दि.१० पासून सुरू झालेल्या महसूल कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील धारूर तहसील मधील संपूर्ण महसुल कार्यालयातील कर्मचारी यांनी १० जुन रोजी काळ्यापिती लावून आंदोलनाला सुरवात केली आहे. दांगट समितीचा अहवाल स्वीकारून महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करणे, महसूल विभागातील महसूल सहाय्यक, महसूल कर्मचारी यांचा ग्रेड पे वाढवून देणे व रिक्त पदे तात्काळ भरणे, कोतवाल पदाला चतुर्थी श्रेणी दर्जा देण्यात यावा आदी मागण्यांबाबत महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलनात राज्य शासनाने राज्य महूसल कर्मचाऱ्यांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची पूर्तत: होत नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व महसुली कर्मचायांकडून १० जुलैपासून टप्याटप्प्याने कार्यालयावर निदर्शने, १२ जुलैरोजी लेखणी बंद आंदोलन तर १५ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनामध्ये धारूर तहसील कार्यालयातील मधील महसूल कर्मचारी संघटनेचे श्री.प्रकाश गोपड, बनसोडे प्रदीप, मंजुश्री गादेवाड,महादेव धुमक, गुरुप्रसाद तरळकर, संजय धबडगे,शिवाजी घुले,बाळू उगले,ज्योतिबा तिबोले,अतुल चोपडे,बाळू कुटे, यांच्यासह अनेक महसूल कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला आहे.विशेष म्हणजे,महसूल कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील विविध योजना



साठी येणाऱ्या लोकांची कार्यालयीन कामे प्रभावित झाली आहेत. यामुळे शासनाने या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी असी जनतेतूनही मागणी होत आहे. कारण या आंदोलनामुळे कामे ठप्प झाली आहेत. सध्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वसामान्य लोकांची तहसील कार्यालयात मोठी गर्दी असते परंतु या आंदोलनामुळे त्यांची मोठी अडचण निर्माण होत आहे म्हणून शासनाने वेळीच लक्ष घालून महसूल कर्मचारी यांच्या मागण्यांची दखल घेणं आवश्यक आहे.

## संत रोहीदास महामंडळातील कर्जे प्रकरणाचा लाभ नवउधोजकांनी मोठ्या संख्येने घ्यावा -बाळासाहेब राऊत

(बीड प्रतिनिधी)संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,मुंबई



या ठिकाणी चर्मकार समाजातील समाजबांधवांना महामंडळाकडून उपलब्ध होणाऱ्या कर्ज प्रकरणा संबधी, उपलब्ध कर्ज निधी संबधी विचारणा संत रोहीदास प्रतिष्ठानाचे अध्यक्ष बाळासाहेब राऊत यांनी भेट घेवुन केली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बीड जिल्ह्याच्या ऑफिसला कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात यावा यासंबंधीची मागणी संत रोहिदास चर्मोद्योग व विकास महामंडळचे व्यवस्थापकीय संचालक मा धम्मज्योती गजभिये यांच्याकडे विचारणा केली .माननीय गजभिये साहेब यांनी उपलब्ध निधी संदर्भात सविस्तर माहिती दिली.तसेच गरजवंतांनी विनात्रुटी सह अर्ज दाखल केल्यास अर्ज पडताळणी करून तात्काळ कर्ज मंजूर करण्याची हमी दिली. संत रोहिदास चर्मोद्योग व विकास महामंडळाचे सह संचालक श्री रितेश गोंदले यांनी देखील बीड जिल्ह्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यासाठी तत्काळ प्रयत्न करू असे सांगितले.समाजातील सर्व गरजवंत उद्योगी बांधवाना विनंती आहे की, आपण आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून महामंडळाकडे रितसर कर्जासाठी अर्जदाखल करावेत असे आवाहन संत रोहिदास प्रतिष्ठाणाचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब राऊत यांनी केले आहे.

# राज्य सरकारने शिक्षकांच्या प्रश्नाला गांभीर्याने घ्यावे , आश्वासन नको,शासन निर्णय हवा-डॉ.जावेद शेख

**बीड/प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा शिक्षक हा कणा असून शिक्षकांनाच विनावेतन व अंशतः पगारीवर काम करावे लागते ही निंदनीय बाब आहे. कारण गेल्या वीस वर्षापासून काही शिक्षक आजही विनावेतन काम करत आहेत इतकेच नाही तर काही शिक्षक विनावेतन काम करून सेवानिवृत्त ही झाली आहेत परंतु येणाऱ्या प्रत्येक सरकार ने शिक्षकांना फक्त मोठमोठे आश्वासन देऊन वेळ मारून घेण्याचे काम केले आहे प्रचलित धोरण लागू केल्यानंतर महायुती सरकारने हे धोरण बंद केले त्यावेळी शिक्षण मंत्री विनोद तावडे होते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. विरोधी पक्षात असताना आझाद मैदान येथे स्वतः देवेंद्र फडणवीस आंदोलन आंदोलनकर्त्या शिक्षकांना मोठमोठ्या आश्वासनाची खैरात मांडली होती परंतु ही आश्वासनाची खैरात फक्त आश्वासनच राहिले कारण त्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले त्यांनी पहिले प्रचलित धोरण बंद करून सरकारकडे ज्यावेळी पैसा उपलब्ध होईल त्यावेळी आम्ही पुढील टप्पा देऊ असा जीआर काढून शिक्षकांच्या जीवनाशी खूप मोठा खेळ खेळला गेला. गेल्या वीस वर्षापासून काही शिक्षक विनावेतन काम करत असताना सुट्टीच्या दिवशी भाजी विकणे दूध विकणे इतकेच नव्हे तर मिस्तरी काम करणे भंगार धंदा करणे अशा प्रकारचा व्यवसाय करून आपल्या मुलाबाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेल ते काम करावे लागत आहे परंतु सत्तेत असणाऱ्या प्रत्येक मंत्र्यांना याचे काहीही गांभीर्य वाटत नाही कारण बरोबर आहे जे मंत्री एसी मध्ये बसून आपली वेळ मारुन घेत आहेत यांना शिक्षकांच्या प्रश्नांना विचार करण्यास वेळही नाही किंवा शिक्षकांच्या प्रश्नावर उत्तर देण्यास असमर्थ ठरत आहेत. शिक्षक आमदार निवडणूक झाली मोठ मोठी आश्वासने दिली गेली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर आपलं सरकार गरिबीचं सरकार आहे हे सरकार देणार आहे, निवडणूक झाली की मी आपणाला टप्पा वाढ देणार आहे तुम्ही काळजी करू नका अशी मोठी आश्वासने देऊन वेळ मारून घेतली परंतु एकीकडे मुख्यमंत्री मी देणार आहे असे म्हणत आहेत तर दुसरीकडे शिक्षण मंत्री केसरकर सप्टेंबर पर्यंत काहीही करता येत नसल्याचे बोलताना दिसत आहेत. म्हणजे आश्वासने देऊन आंदोलने थांबवण्यात किती मोठेपण आहे असे जर मंत्र्यांना वाटत असेल तर हे साफ चुकीचे आहे. निगरगट्ट सरकारला शिक्षकांच्या परिवाराची चिंता नाही त्यांना



फक्त चिंता आहे ती स्वतःच्या खुर्चीची. स्वतःच्या सत्तेची. परंतु आता शिक्षकांनी ठरवले आहे येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीमध्ये पोकळ आश्वासने देणाऱ्या मंत्र्यांना थारा द्यायचा नाही आणि आपल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी आंदोलन हाच मोठा पर्याय आहे असे वाटू लागले त्यामुळे विनाअनुदानित अंशतः अनुदानित शिक्षक प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी आंदोलनासाठी सज्ज झाले पाहिजे इतकेच नव्हे तर शाळा बंद आंदोलन केल्याशिवाय आता पर्याय उरला नाही कारण प्रत्येक वेळेस आश्वासने देऊन वेळ मारून घेत आहेत आता ते चालणार नाही आता शिक्षकांनीही जागे झाले पाहिजे आपल्या मुला बाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी आता आंदोलन शिवाय पर्याय नाही शिक्षक प्राध्यापक शक्यता कर्मचारी यांनी जर निश्चय केला की येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत अशा थापा देणाऱ्या मंत्र्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहायचे नाही.

महाराष्ट्रातील विनाअनुदानित , अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, सेवा संरक्षण, प्रचलित धोरण, शासन निर्णय त्वरित काढून शिक्षकांच्या प्रश्नाला गांभीर्याने घ्यावे असे आवाहन डॉ.जावेद शेख यांनी केले आहे.

## सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार 2025

बीड, दि. 18, : राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात आपत्ती प्रतिबंध, आपत्ती पूर्वतयारी, आपत्ती सौम्यीकरण, शोध व बचाव कार्य, आपत्ती प्रतिसादाचे कार्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन अनुषंगाने संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि आपत्तीपूर्व सूचना प्रणाली या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार 2025 करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात.

पुरस्काराचे स्वरूप

पुरस्कारासाठी तीन व्यक्ती किंवा संस्था यांची निवड केली जाईल संस्थेची निवड झाल्यासदर संस्थेस रक्कम रुपये 51 लक्ष आणि प्रशस्तीपत्र देण्यात येईल मिळालेली रक्कम संस्थेने आपत्ती व्यवस्थापन कार्यासाठी वापरणे संस्थेवर बंधनकारक असेल सदर पुरस्कारासाठी व्यक्तीची निवड झाल्यास व्यक्तीस रक्कम रुपये पाच लक्ष आणि प्रशस्तीपत्र बहाल करण्यात येणार आहे

अर्ज कोण करू शकतात

पुरस्कारासाठी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात कार्य करणारी भारतीय नागरिक असलेली व्यक्ती किंवा भारतीय संस्था अर्ज करू शकते.

अर्जाकरिता संपर्क

केंद्र सरकार मार्फत सदर पुरस्कारासाठी देण्यात आलेल्या पुढील रिंगवर ऑनलाईन अर्ज दाखल करावा. https://awards.gov.in

अर्ज करण्यासाठी कालावधी

पुरस्कारासाठी दिनांक 31 ऑगस्ट 2024 पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करणे आवश्यक आहे पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांची नावे दिनांक 23 जानेवारी 2025 या दिवशी सुभाषचंद्र बोस यांची जयंती केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात येतील सदर पुरस्काराचे अधिक माहितीसाठी संबंधितांनी https://awards.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी जिल्ह्यातील पात्र व्यक्ती आणि संस्था यांनी सादर पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करावेत असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय यांचे मार्फत करण्यात येत आहे

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांना महाविद्यालय स्तरावर उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई, १८ जुलै: राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत पुढील ३ महिन्यात अनेक उपक्रम हाती घेण्यात आले असून, विविध महाविद्यालयांकडून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील १००० महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार असल्याचे कौशल्य विकास विभागाकडून सांगण्यात आले होते, परंतु आत्तापर्यंत १९५८ महाविद्यालयांनी याकरिता अर्ज दाखल केले आहेत. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळामध्ये अधिक महाविद्यालयांना या उपक्रमात सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सांगितले आहे. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रावर पुढील महिन्यापासून प्रशिक्षण कार्यक्रम देखील सुरु होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. या




धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच, युवक-युवतींना महाविद्यालयांमध्येच कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र” ही नाविन्यपूर्ण योजना सुरु करण्यात आली आहे. राज्यातील १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. याकरिता अर्ज देखील मागवण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात १००० पेक्षा अधिक महाविद्यालयांनी उत्स्फूर्तपणे अर्ज दाखल केले आहेत. ही बाब सकारात्मक असून, याकरिता विभागाने देखील पुढाकार घेतला आहे. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात प्रतिवर्षी साधारण १,५०,००० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे. या योजनेसाठी शासनाने १५० कोटी रुपयांची तरतूद केली असून १५ ते ४५ वयोगटातील सर्व युवक-युवती पात्र आहेत. कालसुसंगत तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण महाविद्यालयीन युवक युवतींना देऊन त्यांना रोजगारासाठी सक्षम बनवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आपल्या कार्य क्षेत्रातील पात्र महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यासाठी महाविद्यालयांना यापूर्वीच आवाहन करण्यात आले होते, याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. या योजनेद्वारे पुढील ३ वर्ष सहकार्य देण्यात येणार आहे. रोजगार मागणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे युवक घडावेत, यासाठी राज्य आणि केंद्र सरकार काम करत असल्याचे मत मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यानिमित्ताने व्यक्त केले आहे.

# प्रा.सत्येंद्र पाटील यांचा भव्य असा सेवागौरवपुर्ती सोहळा संपन्न!

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील सर यांच्या सेवागौरवपुर्ती सोहळ्याचे गौरव समितीच्या वतीने 14 जुलै रोजी ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल बीड येथे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री अशोकरावजी पाटील होते . तर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित आबा पाटील, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई मेटे, माजी आमदार श्री.राजेंद्र जगताप, माजी आ.केशवराव आंधळे, श्री. रामकृष्णजी बांगर, माजी नगराध्यक्ष श्री.दिलीपराव गोरे,भाजपा नेते श्री. रमेशराव पोकळे,आमदार श्री. कैलास पाटील यांचे वडील श्री. बाळासाहेब पाटील,उबाठा शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख श्री.परमेश्वर सातपुते, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ,राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर,शिवसेना जिल्हाध्यक्ष श्री.अनिल दादा जगताप,प्रा.श्री.चंद्रकांत मुळे, श्री. सचिन मुळुक, श्री.विलासराव बडगे बापू, श्री.अरुण नाना डाके, डॉ.टी.एल.देशमुख, नगरसेवक श्री.विलास विधाते, श्री.विनोद मुळुक,श्री. किशोर अप्पा पिंगळे, श्री. सुरेशतात्या पाटील,श्री.गिरीश देशपांडे, सी/ए श्री.बी.बी.जाधव हे होते,या प्रसंगी सर्वच मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रा.सत्येंद्र पाटील यांच्या विविध कार्याचा व सर अजातशत्रू असल्याचा उल्लेख तथा गौरव केला. आणि सरांच्या सामाजिक कार्यास आवश्यक ती मदत करू असा शब्द देऊन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा ही दिल्या. या प्रसंगी प्रा.सत्येंद्र पाटील सर यांचा सपत्नीक सत्कार करून सन्मान पत्र देण्यात आले. सन्मान पत्राचे सार्वजनिक वाचन प्राचार्य डॉ.श्री. विवेकाजी मिरगाने सरांनी केले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना पाटील सरांनी जीवनात ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले त्यांचा मी आजन्म ऋणी असून सेवा निवृतीचे आयुष्य समजसेवेसाठी समर्पित करून पुढच्या आयुष्यात मी समाजकार्यात सक्रिय राहणार




असे सांगून केजकर पाटील परिवार,नातेवाईक,डॉक्टर,महिला वर्ग,वकील,प्राचार्य,प्राध्यापक, व्यापारी, शिक्षकेतर कर्मचारी, कोचिंग क्लासेस संचालक,पत्रकार विविध शैक्षणिक संस्था चालक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी दिग्गज मोठ्या संख्येने उपस्थिती होते .या सर्वांचे आभार व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष प्रा.विजय पवार, प्रा. राजेश मोराळे,प्रा.उमाकांत जगताप, श्री. कल्याणराव वाघमारे, प्रा. रामनाथ डाके, श्री.अशोक सुखवसे, डॉ. नारायण काकडे,प्राचार्य डॉ. बाळासाहेब खांडे, प्रा.टी. जी. कांबळे, प्रा.संजय काकडे,श्री. सुमंत खांडे,प्रा.मळेकर,डॉ. परमेश्वर वाणी,प्रा.मिलिंद मोराळे, श्री. संतोष सावंत समितीचे सर्व सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले!

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. श्री. विजय पवार सर, संचलन प्रा पंजाब येडे तर आभार प्रदर्शन प्राध्यापक संजय काकडे यांनी केले.

# पावसाचे ७३ दिवस उरले; मराठवाड्यातील प्रमुख धरणे भरणार का? मुसळधार पावसाची प्रतीक्षा

**छ. संभाजीनगर/प्रा संजय तुपे**

पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटला तरी मराठवाड्यातील नदी, नाल्यांना पूर आलेला नाही. परिणामी, या वर्षी मराठवाड्यातील बहुतेक सर्वच लहान-मोठ्या धरणांनी तळ गाठलेला आहे. सर्वात मोठ्या जायकवाडी प्रकल्पात केवळ ४ टक्के जलसाठा उरला आहे, तर ११ मोठ्या प्रकल्पांपैकी ४ धरणे कोरडी आहेत. मध्यम प्रकल्पांतही केवळ १४ टक्के जलसाठा शिल्लक आहे. राहिलेल्या ७३ दिवसांत हे प्रकल्प कसे भरतील, याची चिंता प्रशासन आणि शेतकऱ्यांना सतावत आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही वरुणराजा मराठवाड्यावर नाराज असल्याने दीड महिन्यात मुसळधार पावसाअभावी नदी-नाल्यांना पूर आलेला नाही. नद्यांना पूर न आल्याने मराठवाड्यातील सर्वात मोठ्या जायकवाडी धरणात केवळ ८९ द.ल.घ.मी. अर्थात ४ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. तर सिद्धेश्वर (हिंगोली), मांजरा आणि माजलगाव (बीड) तसेच सीना कोळेगाव (धाराशिव) हे जलसाठा आहे. तर सिद्धेश्वर (हिंगोली), मांजरा आणि माजलगाव (बीड) तसेच सीना कोळेगाव (धाराशिव) हे प्रकल्प कोरडे आहेत. केवळ येलदरी प्रकल्पात २८ टक्के, उर्ध्व पेनगंगामध्ये ३० टक्के, निम्न तेरणा १६ टक्के तर निम्न मनार प्रकल्पात



२६ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षी ओसंडून वाहणाऱ्या विष्णूपुरी प्रकल्पात ४४ तर निम्न दुधना प्रकल्पात ४ टक्के पाणी असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली. मराठवाड्यात जून ते ऑगस्टपर्यंतच मौसमी पाऊस पडतो. सप्टेंबर महिन्यात परतीचा पाऊस पडत असतो. यामुळे आता चांगल्या पावसाचे केवळ ७३ दिवस उरले आहेत. या कालावधीत मुसळधार पावसाची प्रकल्पांना प्रतीक्षा आहे. मध्यम प्रकल्पाचीही दयनीय अवस्था मोठ्या प्रकल्पांप्रमाणेच मराठवाड्यातील ७५ मध्यम प्रकल्पांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १६ आणि जालना जिल्ह्यातील ७ प्रकल्पांमध्ये केवळ सरासरी ३ टक्के जलसाठा आहे. बीड जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांत ९ टक्के, लातूरमधील ८ प्रकल्पांत ११ टक्के पाणीसाठा आहे. धाराशिव जिल्ह्यातील १७ प्रकल्पांत ६, नांदेड जिल्ह्यातील ९ धरणांत १७ व परभणी जिल्ह्यातील ७ प्रकल्पांत ७ टक्के जलसाठा उरल्याचे जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता एस. के. सब्बीनवार यांनी सांगितले. मागील दोन वर्षांच्या तुलनेत अत्यल्प साठा मध्यम प्रकल्पाच्या मागील दोन वर्षांतील एकूण प्रकल्पांच्या सरासरी जलसाठ्याच्या तुलनेत हा जलसाठा अत्यल्प आहे. २०२२ मध्ये मराठवाड्यातील जलसाठा अत्यल्प आहे. २०२२ मध्ये मराठवाड्यातील मध्यम प्रकल्पात सरासरी ३१ टक्के पाणीसाठा होता. तर गतवर्षी २०२३ मध्ये १७ टक्के होता. या वर्षी केवळ ८ टक्के आहे.

## केंद्र शासनाचे जलशक्ती अभियान केंद्रीय पथकाचा अभ्यास दौरा संपन्न

**जालना/असलम कुरेशी**

केंद्र शासनाचे जलशक्ती अभियान केंद्रीय पथक जालना येथे दि. १५ ते १७ जुलै २०२४ ला जालना जिल्ह्याच्या प्रथम अभ्यास दौऱ्यावर असताना त्यांनी अभियानाअंतर्गत झालेल्या विविध कामांची पाहणी केली. तसेच दि.16 जुलै 2024 रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत जलशक्ती अभियान अंतर्गत झालेल्या कामांचे पथकासमोर सादरीकरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय नोडल अधिकारी श्रीकांत नामदेव, वैज्ञानिक तथा तांत्रिक अधिकारी प्रिती राऊत यांनी जालना प्रशासनामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांचे कौतुक केले. अभियानाअंतर्गत झालेल्या विविध कामांची दि. १५ जुलै २०२४ रोजी पाहणी पथकाने केली. यात दरेगाव येथील रिचार्ज शाफ्ट व सामनगाव येथे शेततळे, सिमेंट नाला बांध व कोल्हापुरी बंधारा, अंबड येथील पुरातन पुष्कर बारव ला भेट दिली. दि. १६ जुलै रोजी कौचलवाडी येथे पोणलोट समिती व गावकऱ्यांशी चर्चा केली व जलसंधारण कामांमधिल महिलांच्या सहभागाचे कौतुक केले. तसेच दि. १७ जुलै २०२४ रोजी अंहकार देऊळगाव येथील जलजीवन मिशन अंर्तगत पुर्ण करण्यात आलेल्या हर घर जल योजनेची पाहणी केली. तसेच जिल्हा जलसंधारण आराखडा तात्काळ तयार करण्याबाबत, जिल्ह्यातील पाणी साठ्यांची जिओ टॅगींग, पुरातन बारवांची दुरुस्ती, जन जागरुकता अभियान मधे जास्तीत जास्त महिलांचा समावेश करण्याबाबत सुचना दिल्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रीता मैत्रेवार जालना, जिल्हा जलसंधारण अधिकारी आर.एच. झुरावत, उपजिल्हाधिकारी (रोहयो) पदमाकर गायकवाड, जिल्हा अधिक्षक कृषी अधिक्षक जी. आर. कापसे, कार्यकारी अभियंता विद्या कानडे, कृषी अभियंता प्रा. पी.व्ही. वासरे व इतर अधिकारी उपस्थित होते. असे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## शेतात खुरपणी करीत असलेल्या महिलेच्या अंगावर विज वाहक तार पडून शॉक लागून दुर्दैवी मृत्यू

**केज /सचिन भालेराव**

शेतातील पोलवरील विद्युत तारा वाऱ्याने एकमेकांना चिटकून स्पार्किंग होऊन विद्युत तार निसटून खाली आल्याने खुरपणी करीत असलेल्या एका ४५ वर्षीय महिलेला शॉक बसल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना मानेवाडी ता. केज येथे बुधवारी दि. १७ दुपारी २:३० वा. च्या सुमारास घडली.

बीड जिल्ह्यातील मानेवाडी ता. केज येथील विमल बाबुराव माने वय (४५ वर्ष) या बुधवार दि. १७, जुलै रोजी शेतात कापूस पिकात खुरपणी करीत होत्या. दुपारी २:३० वा. च्या सुमारास वाऱ्याने पोलवरील विद्युत तारा एकमेकांना चिकटून स्पार्किंग झाल्याने एक विद्युत तार पोलवरील चिनी मातीच्या इन्श्युलेटर (विद्युत दुर्वाहक चिमणी) निसटून खाली येत लोंबकळली होती. याच वेळी खुरपणी करीत असलेल्या विमल माने या उठून पुढे सरकत असताना लोंबकळत असलेली विज वाहक तार त्यांच्या गळ्याला लगल्याने शॉक लागून गळा भाजून त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या आदेशा वरून पोलीस उपनिरीक्षक बसवेश्वर चनशेट्टी, पोलीस उपनिरक्षक राहुल पतंगे, सहाय्यक पोलीस उपनिरक्षक रमेश सिरसाट यांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. त्या नंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या शवगृहात मृतदेह ठेवण्यात आला असून गुरुवारी शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश सिरसाट यांनी दिली. मयत विमल माने यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असून त्यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यू बद्दल गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## कुसुमवत्सल्य फाऊंडेशन कडून पदाधिका-यांची निवड जिथे कमी तिथे आम्ही माणुसकी संवर्धनाचा वसा

**पुणे -प्रतिनिधी**

सामाजिक कार्य आणि अनेक समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून नेहमी कार्यरत असणा-या कुसुमवत्सल्य फाऊंडेशन कडून संस्थेच्या चळवळ विस्तारासाठी पदाधिका-यांची निवड नुकतीच गुरूवारी फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा वैशाली पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. आत्मनिर्भर समाज बांधणीसाठी... निराधारांना स्वावलंबी बनविण्यासाठी... अनाथ, अपंग, गरजुवंत आणि मागासलेल्यांना आधार देऊन लोक प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य व सहभागातून कार्याला गती मिळेल याच साठी हि नियुक्ती आहे असे प्रतिपादन वैशाली पाटील यांनी केले.



अंजली चव्हाण- जनसंपर्क अधिकारी, स्वाती हीरवे-कार्याध्यक्ष, मनिषा समर्थ -संचालिका, अर्चना कल्याणी- पर्यावरण प्रमुख ,धनंजय मोहिते-संचालक, समीर खोत पाटील-जनसंपर्क अधिकारी ,अनंता दळवी- संचालक, विलास राठोड- कार्याध्यक्ष ,पुणे. राजू सांगळे- कार्याध्यक्ष पुणे, विद्या कोतवाल-संचालिका, बालाजी सातपुते- संचालक, नेहा सपकाळ- कायदे सल्लागार ,चांदणी तांदळे- शहर अध्यक्ष पुणे, राजेश कुंभार - पुणे शहराध्यक्ष, सुनिल बनसोडे-छायाचित्रकार, अशी पदे नियुक्त करून पदाधिका-यांना दिग्दर्शक अर्जुन नोटके, लेखक गुलाबराजा फुलमाळी यांच्या हस्ते सन्मानित करून निवडपत्र देण्यात आले प्रसंगी मनीषा गीरमे यांचीही उपस्थिती होती.

कुसुमवत्सल्य फाऊंडेशन कडून राबविण्यात येणाऱ्या आगामी उपक्रमाबद्दल चर्चा संस्थापक अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली चांदणी तांदळे यांनी फाऊंडेशनच्या वतीने पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन उपस्थितांचे आभार मानले.

## योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार खपवून घेणार नाही - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### विविध महत्वाकांक्षी योजनांची आढावा बैठक

**पुणे/पंकज भंडारी**

दि. १८ : शासन गोरगरीब, सर्वसामान्यांना लाभ मिळावा यासाठी योजना राबवत असते. अशा घटकांकडून पैसे काढणे हे योग्य नाही, त्यामुळे योजनांच्या अमंलबजावणीत गैरप्रकार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असे कठोर इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिला.



शासनाने जाहीर केल्या सात महत्वाकांक्षी योजनांचा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा घेण्यात आला. या बैठकीस जिल्हास्तरीय विविध यंत्रणांचे अधिकाऱ्यांसह, संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त आदी उपस्थित होते. तसेच वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्य सचिवांसह विविध विभांगांचे सचिवस्तरीय अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार होऊ नये याची दक्षता घ्या. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांनी यासाठी दक्ष राहीले पाहिजे. योजनांच्या अंमलबजावणीचे उद्दीष्ट साध्य करताना लाभार्थ्यांची नोंदणी करताना काही घटक गैरप्रकार करत असतील, ते वेळीच रोखले पाहिजे. विशेषत: 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'त कुणी महिला भगिनींकडून अर्जासाठी पैशांची मागणी केल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करा. अशांना केवळ निलंबित करून नका, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याला तुरुंगात पाठवा. या योजनेत भगिनींना कुणीही नाडता काम नये याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. या नोंदणीचा सातत्याने आढावा घेतला जाणे आवश्यक आहे. महत्वाच्या अशा या सर्वच योजनांमध्ये केवळ शासकीय केंद्रावर भरले जाणारे अर्जच पडताळणीसाठी ग्राह्य धरले जातील अशा सूचना देण्यात याव्यात. अधिकृत अशा केंद्रावरच अर्ज भरले जातील, असे प्रयत्न केले जावेत. खासगीरित्या आणि अन्य कुठल्यापद्धतीने कुणी अर्ज भरत असतील, त्यांना वेळीच रोखण्यात यावे, अशा सूचनाही या बैठकीतून देण्यात आल्या.

## घोडेगाव ,शंकरपूरवाडी येथे एक शेतकरी , एक झाड ही,शपथ घेऊन भव्य वृक्ष लागवड .

**खुलताबाद/प्रा संजय तुपे**

दिनांक १८/०७/२०२४ रोजी खुलताबाद येथील घोडेगाव व शंकरपूरवाडी क्षेत्रातील परिसरात बी.सी.आय शेतकऱ्यांसमवेत संजीवनी सक्षमीकरण आणि विकास संस्था व पर्यावरण लोककल्याण व वन संरक्षण संस्था खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने गावामध्ये एक शेतकरी ,एक झाड या संकल्पनेतून भव्य वृक्ष लागवड करण्यात आली व संस्थेअंतर्गत



वृक्ष वाटप करण्यात आले,या वेळी कार्यक्रम क्षेत्र प्रवर्तक ज्ञानेश्वर पा.जाधव आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा उप अध्यक्ष तथा पर्यावरण लोककल्याण व वन संरक्षण संस्था खुलताबाद तालूका अध्यक्ष प्रा. संदिप भाऊसाहेब पा.जाधव,क्षेत्र प्रवर्तक अर्चना ज्ञानेश्वर पा.जाधव व समस्त बी.सी.आय शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते .

## उमरा येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट**

नांदेड : आषाढी एकादशी निमित्ताने उमरा येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळी ५ वाजता गावातील मुख्य रस्त्याने टाळ मृदुंगाच्या गजरात विठू माऊलीच्या भक्ती भावात पालखी सोहळ्याला सुरुवात करण्यात आली. गावातील प्रत्येक चौका चौकात दिंडीचे स्वागत करण्यात आले.आनंदीमय वातावरणात दिंडी सोहळा पार पडला. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे



आणि याच संतांच्या भूमीत उमरा नगरीमध्ये सर्वधर्म बंधुभाव जोपासत सर्व समाज बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत आषाढी एकादशी मोठ्या भक्ती भावात अगदी उत्साही आनंदी वातावरणात उमरा गावकऱ्यांनी साजरा केली. यावेळी वारकरी गोविंदराव पांचाळ ,केशव पाटील सिरसाट,संभाजी पाटील सिरसाट, एम.डी सिरसाट (गुरुजी) बापूराव पतलाये, गोविंद सिरसाट ,प्रकाश ढगे,तेजेराव सिरसाट, बालाजी बोडके, सदाशिव वडजे, शेषराव जाधव यांच्यासह माता भगिनी बाळ गोपाळ वारकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

# अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर काढणार आरक्षण बचाव यात्रा चैत्यभूमीवरुन २५ जुलै रोजी होणार यात्रेला सुरुवात

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

सर्व ओबीसी घटकांची मागणी होती की, वंचित बहुजन आघाडी भूमिका मांडत आहे ती गावोगावी गेली पाहिजे. पक्षाच्या वतीने आम्ही ठरवले की, या सामाजिक संघटनांना सोबत घेऊन 25 जुलैला दादर, चैत्यभूमी येथून आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात करायची आणि त्याच दिवशी फुलेवाडा येथे जायचे. 26 तारखेला राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणाची घोषणा केली होती. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांना नतमस्तक होऊन आरक्षण बचाव जनयात्रा काढण्याचे आम्ही ठरवले असल्याची घोषणा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी आज औरंगाबाद येथील पत्रकार परिषदेत केली. २५ जुलैला मुंबईतील चैत्यभूमी आणि पुण्यातील फुलेवाड्याला अभिवादन करून अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आरक्षण बचाव यात्रा महाराष्ट्रभर काढण्यात येणार आहे. आंबेडकर म्हणाले, जरांगे पाटील यांनी आपले आंदोलन सुरू केले आहे. दुसऱ्या बाजूस सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. त्या सर्वपक्षीय बैठकीला सर्व मराठा नेते राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेनेचे कोणीच उपस्थित नव्हते. त्यामुळे बैठकीत नेमकी राजकीय पक्षाची भूमिका काय हा प्रश्न वंचित बहुजन आघाडीकडून विचारण्यात आला असल्याचे त्यांनी या वेळी अधोरेखित केले. अ‍ॅड. आंबेडकर म्हणाले की, सर्वपक्षीय बैठकीत मुख्यमंत्र्यांना वंचित बहुजन आघाडीकडून विनंती करण्यात आली होती की, सर्व राजकीय पक्षांना व्यक्तिगत पत्र लिहावे. जरांगे पाटील यांची जी मागणी आहे की, मराठा समाजाला ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण द्यावे या बाबत राजकीय पक्षांची भूमिका काय आहे या संदर्भात विचारणा करावी. पण अजून वंचित बहुजन आघाडीला ते पत्र मिळालेले नाही. श्रीमंत मराठ्यांचे जे पक्ष आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भाजप आणि उध्दव ठाकरेंची शिवसेना हे जोपर्यंत भूमिका मांडत नाहीत तोपर्यंत तोडगा निघत नाही. आरक्षण बचाव यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी कॉर्नर बैठका घेतल्या जातील.



तसेच मुक्कामाच्या ठिकाणी जाहीर सभा होणार आहेत. ओबीसींचे आरक्षण वाचले पाहिजे, sc/st विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे, ओबीसीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा sc/st प्रमाणे शिष्यवृत्ती मिळते ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे. जे कुणबी आहेत त्यांना आरक्षण मिळणारच आहे. आरक्षणाच्या माध्यमातून sc/st आणि ओबीसींना सुद्धा पदोन्नती मिळाली पाहिजे, अशा प्रमुख मागण्या या यात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे अ‍ॅड. आंबेडकर यांनी सांगितले. श्रीमंत मराठ्यांनी तुम्हाला आतापर्यंत फसवलेले आहे. त्यांनी टिकाऊ आरक्षण दिले नाही. तेव्हा ओबीसींच्या आणि आरक्षणवाद्यांच्या हातात सत्ता द्या, त्या सत्तेचा उपयोग हे गरीब मराठ्यांच्या टिकाऊ आरक्षणाचे ताट वेगळं करून देण्याचे आश्वासन आम्ही देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मराठ्यांना आरक्षण न देणे हा श्रीमंत मराठ्यांचा डाव आहे. त्यामुळे आंदोलन हे इथल्या श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात झाले पाहिजे. असे त्यांनी यावेळी म्हटले आहे. पुढे ते म्हणाले की, मी मराठा आरक्षणाचा तोडगा आता मांडणार नाही. कारण आता मांडला तर त्या तोडग्याचा खिमा केल्याशिवाय हे राहणार नाहीत. म्हणून सत्ता आल्यानंतर तो आम्ही मांडू असे मागे मी म्हणालो होतो. आरक्षण बचाव यात्रेत येण्यासाठी आम्ही कोणालाही नाही म्हणत नाही. छगन भुजबळांना यायचे असेल, मुंडेंना यायचे असेल, हाकेंना यायचे असेल तर ते येऊ शकतात. तसेच, अन्य ओबीसी संघटनांनाही आम्ही बोलावले असल्याचे त्यांनी नमूद केले. स्फोटक परिस्थिती होत चालली आहे, ती अजून होऊ नये, शांतता राहिली पाहिजे. ओबीसी संघटना आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या भूमिका स्पष्ट आहेत. पण भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांनी अजून भूमिका घेतल्या नाहीत. यांनीही भूमिका घेतल्या पाहिजेत, जेणेकरून स्फोटक परिस्थिती शांत करता येईल आणि गावगाडा पूर्ववत होईल यासाठी आम्ही ओबीसी आरक्षण बचाव यात्रा आयोजित केली आहे. असे आंबेडकरांनी सांगितले. ही ओबीसी आरक्षण बचाव यात्रा २५ जुलै रोजी दादर चैत्यभूमीपासून सुरू होऊन पुणे महात्मा फुलेवाडा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, जालना असे होत औरंगाबाद येथे समाप्त होणार आहे. औरंगाबाद येथे या यात्रेचे मोठ्या सभेत रुपांतर होणार आहे. एस. सी, एस. टी, ओबीसी आणि भटके विमुक्त यांच्या आरक्षणाचा लढा अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर त्यांच्या राजकारणाच्या सुरुवातीच्या काळापासून लढत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा एस.सी, एस. टी, ओबीसी आणि भटक्या विमुक्तांच्या आरक्षणासाठी लढा दिला होता. त्यामुळे आरक्षणाच्या संदर्भात अ‍ॅड. आंबेडकरांची भूमिका सुद्धा ठाम राहिली आहे. त्यामुळे या आरक्षण बचाव यात्रेची उत्सुकता वाढली आहे.

## विधानसभेची जागा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला सोडावी-रवी काका ढोबळे

आष्टी पाटोदा शिरूर या मतदार संघात विधान सभेची उमेदवारी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला ही जागा सोडण्यात यावी यासाठी माजी खासदार रजनीताई पाटील यांना राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रवी काका ढोबळे यांनी निवेदन दिले आहे . पंधरा ते वीस वर्षापासून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला एकही जागा सोडलेली नाही. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या जिल्हा अध्यक्ष मीनाक्षीताई पांडुळे, आष्टी तालुका अध्यक्ष रवी काका ढोबळे ,पाटोदा तालुका अध्यक्ष राहुल जाधव , शिरूर तालुका अध्यक्ष रमेश सानप यांनी सांगितले की आष्टी , पाटोदा व शिरूर या मतदार संघात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला अनेक मतदार मानणारे असुन या पक्षाच्या चिन्हांचा मतदारांना विसर पडत चालला आहे. राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या महाविकास आघाडी मध्ये शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांना प्रत्येक पंचवार्षिक ला आष्टी पाटोदा शिरूर या मतदारसंघात उमेदवारी देण्यात आली होती परंतु राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला 15 ते 20 वर्षात एकही जागा मिळाली नसून तरी या पंचवार्षिक विधानसभेला काँग्रेसची जागा सोडविण्यात यावी अशी मागणी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील तालुकाध्यक्षांनी केली आहे.

## ग्रामपंचायत पाणजेच्या उपसरपंचपदी हितेश भोईर यांची बिनविरोध निवड.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील पाणजे गावचे सुपुत्र तथा सामाजिक कार्यकर्ते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कट्टर व एकनिष्ठ प्रामाणिक कार्यकर्ते हितेश एकनाथ भोईर यांची पाणजे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाली आहे. गावच्या विकासासाठी रात्रं दिवस धडपणारे, प्रेमळ व्यक्तिमत्व लोकांच्या अडीअचणीला



धावून जाणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. गावातील अनेक प्रश्नांना, समस्यांना त्यांनी न्याय दिला आहे. गावातील गटार, नाले सफाई, पाणी प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. विविध समस्या मार्गी लावल्या. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची निवड पाणजे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी करण्यात आली आहे.यावेळी सरपंच लखपती पाटील, माजी उपसरपंच विलास पाटील, ग्रामसेविका समीक्षा ठाकूर, सदस्या करिष्मा पाटील, सदस्या प्राची पाटील, ग्रामपंचायतचे इतर सदस्य,गावातील जेष्ठ मंडळी, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी नवनियुक्त उपसरपंच हितेश भोईर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यांना ई समृध्दी पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**जालना/असलम कुरेशी**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या https://esamridhi.in/#/login या संकेतस्थळाला भेट देवून अथवा क्युआर कोड स्कॅन करुन आपल्या शेतीमालाची एमएसपी दराने विक्री करण्यासाठी ई समृध्दी पोर्टलवर खरेदी प्री रजिस्ट्रेशन करावे व केंद्र शासनाच्या आधारभुत किंमत खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा मार्केटींग अधिकारी जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई व नाफेड कार्यालय, मुंबई यांच्या संयक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे हंगाम २०२४/२५ मध्ये ही जिल्ह्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेडमार्फत मका, तूर, चना, मुग, उडीद व सोयाबिन खरेदी करण्यात येणार आहे. नाफेड कार्यालयाने शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी ई समृध्दी पोर्टल सुरु केले असून नाफेडमार्फत राबविण्यात येणाऱ्या सरकारी योजनांचा लाभ राज्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा यासाठी शेतकऱ्यांनी ई समृध्दी पोर्टलवर नोंदणी करुन आपल्या शेतीमालास योग्य दर घ्यावा, याकरीता सदर पोर्टलची निर्मिती करण्यात आलेली आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## केजच्या बस स्थानकातून वृद्धांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन लांबविली !

**केज/सचिन भालेराव**

गावाकडे जाण्यासाठी बसमध्ये चढत असलेल्या एका वृद्ध व्यक्तीच्या गळ्यातील सोन्याची चैन बस स्टँड वरून चोरीला गेली आहे. या बाबतची माहिती अशी की, दि. १६ जुलै रोजी लातूर जिल्ह्यातील चंद्रकांत संतराम गुळवे वय (६८ वर्ष) हे लातूर जिल्ह्यातील रेणापूर या त्यांच्या गावाकडे जाण्यासाठी केज येथील बस स्टँडवर थांबले होते. त्यावेळी दुपारी ४:३० वा. च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर-अहमदपूर या गाडीत चढत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाची ३४ हजार रु किंमतीची सोन्याची चैन चोरीला गेली आहे. या प्रकरणी चंद्रकांत गुळवे यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गु. र. नं. ३९७ भा. न्या. सं.३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार श्रीकांत चौधरी हे तपास करीत आहेत. बस स्टँड मधील सीसीटिव्ही कॅमेरे कुचकामी :- बस स्टँड आणि परिसरातील चोऱ्या, पाकीटमारी आणि महिलांचे दागिने चोरीच्या घटना यावर तिसऱ्या डोळ्याची नजर रहावी म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. परंतु या बस स्थानकाचा जो भाग सीसीटिव्ही कॅमेऱ्याच्या नजरेखाली येत नाही. त्या भागात अनेकवेळा चोरीच्या घटना घडलेल्या आहेत.

## प्रा.सत्येंद्र पाटील यांचा भव्यअसा सेवागौरवपुर्ती सोहळा संपन्न!

**बीड/प्रतिनिधी**

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सर यांच्या सेवागौरवपुर्ती सोहळ्याचे गौरव समितीच्या वतीने १४ जुलै रोजी ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल बीड येथे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री अशोकरावजी पाटील होते . तर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित आबा पाटील, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई मेटे, माजी आमदार श्री.राजेंद्र जगताप, माजी आ.केशरराव आंधळे, श्री.रामकृष्णजी बांगर, माजी नगराध्यक्ष श्री.दिलीपराव गोरे,भाजपा नेते श्री.रमेशराव पोकळे,आमदार श्री.कैलास पाटील यांचे वडील श्री. बाळासाहेब पाटील,उबाठा शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख श्री.परमेश्वर सातपुते,एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ,राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर,शिवसेना जिल्हाध्यक्ष श्री. अनिल दादा जगताप,प्रा.श्री.चंद्रकांत मुळे,श्री.सचिन मुळुक, श्री.विलासराव बडगे बापू, श्री.अरुण नाना डाके, डॉ.टी.एल.देशमुख, नगरसेवक श्री. विलास विधाते, श्री.विनोद मुळुक,श्री. किशोर अप्पा पिंगळे, श्री. सुरेशताया पाटील,श्री.गिरीश देशपांडे, सी/ए श्री. बी.बी.जाधव हे होते,या प्रसंगी सर्वच मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या विविध कार्याचा व सर अजातशत्रू असल्याचा उल्लेख तथा गौरव केला. आणि सरांच्या सामाजिक कार्यास आवश्यक ती मदत करू असा शब्द देऊन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा ही दिल्या. या प्रसंगी प्रा.सत्येंद्र पाटील सर यांचा सपत्नीक सत्कार करून सन्मान पत्र देण्यात आले. सन्मान पत्राचे सार्वजनिक वाचन प्राचार्य डॉ.श्री. विवेकाजी मिरगाने सरांनी केले. यावेळी सत्काराला उत्तर देताना पाटील सरांनी जीवनात ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले त्यांचा मी आजन्म ऋणी असून सेवा निवृतीचे आयुष्य समजसेवेसाठी समर्पित करून पुढच्या आयुष्यात मी समाजकार्यात सक्रिय राहणार असे सांगून केजकर पाटील परिवार,नातेवाईक,डॉक्टर,महिला वर्ग,वकील,प्राचार्य,प्राध्यापक, व्यापारी, शिक्षकेतर कर्मचारी, कोचिंग क्लासेस संचालक,पत्रकार विविध



शैक्षणिक संस्था चालक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी दिग्गज मोठ्या संख्येने उपस्थिती होते .या सर्वांचे आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष प्रा.विजय पवार, प्रा. राजेश मोराळे,प्रा.उमाकांत जगताप, श्री. कल्याणराव वाघमारे, प्रा.रामनाथ डाके, श्री.अशोक सुखवसे, डॉ. नारायण काकडे,प्राचार्य डॉ. बाळासाहेब खांडे, प्रा.टी. जी. कांबळे, प्रा.संजय काकडे,श्री. सुमंत खांडे,प्रा.मळेकर,डॉ. परमेश्वर वाणी,प्रा.मिलिंद मोराळे, श्री. संतोष सावंत समितीचे सर्व सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले! कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. श्री.विजय पवार सर, संचलन प्रा पंजाब येडे तर आभार प्रदर्शन प्राध्यापक संजय काकडे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077